# संत गाडगे बाबा
# अमरावती विद्यापीठ

## एकोणतिसावा दीक्षांत समारंभ

मा. कुलगुरु डॉ. मोहन खेडकर
यांचे
स्वागतपर व प्रास्ताविक भाषण

अमरावती
शनिवार, दिनांक १६ फेब्रुवारी, २०१३

## एकोणतिसावा दीक्षांत समारंभ

## दि. १६ फेब्रुवारी २०१३

## मा. कुलगुरू डॉ. मोहन खेडकर यांचे प्रास्ताविकपर भाषण

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या एकोणतिसाव्या दीक्षांत समारंभाचे प्रमुख अतिथी मा. डॉ. एस. एस. मंथा, अमरावती विद्यापीठाचे सर्व माजी कुलगुरू, व्यवस्थापन परिषदेचे सर्व आजी-माजी सन्माननीय सदस्य, विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता, विविध प्राधिकारिणींचे सदस्य, उपस्थित लोकप्रतिनिधी, विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, शिक्षणप्रेमी नागरिक, पत्रकार बंधू आणि विद्यार्थी मित्र-मैत्रिणींनो!

विद्यापीठाच्या एकोणतिसाव्या दीक्षांत समारंभात कुलगुरू म्हणून मी आपणा सर्वांचे सहर्ष स्वागत करतो. सुरुवातीला आजच्या दीक्षांत समारंभास लाभलेले प्रमुख अतिथी डॉ. एस. एस. मंथा यांचा आपणास थोडक्यात परिचय करून देतो. डॉ. एस. एस. मंथा हे एक व्यासंगी शिक्षक, कुशल प्रशासक आणि माहिती-तंत्रज्ञान व तंत्रशिक्षण क्षेत्रात भरीव योगदान असणारे सन्माननीय व्यक्ती आहेत. ते दूरदृष्टीचे तंत्रज्ञ असून ई-गव्हर्नन्सला चालना देणारे व्यक्ती म्हणून त्यांचा लौकिक आहे. सध्या ते अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे अध्यक्ष आहेत.

डॉ. मंथा हे महाराजा सयाजीराव बडोदा विद्यापीठाचे पदवीधर असून मेकॅनिकल इंजिनिअरिंग या विषयात त्यांनी पदवी प्राप्त केली आहे. याच विषयात व्ही.जे.टी.आय. मुंबई येथून त्यांनी आपले पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले व पुढे शिक्षकीपेशात पदार्पण करीत उत्तरोत्तर प्रगती केली. व्ही.जे.टी.आय. मुंबई, या संस्थेत त्यांनी प्राध्यापक म्हणून आणि मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागाचे प्रमुख म्हणून सहा वर्षे कार्य केले. येथूनच पुढे महाराष्ट्र शासनाने त्यांची एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू पदावर नियुक्ती केली. या पदावर त्यांनी दोन वर्षे कार्य केले. मार्च २००९ मध्ये अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या उपाध्यक्ष पदावर त्यांची नियुक्ती झाली आणि येथेच दि. ५ जानेवारी २०१२ पासून ते अध्यक्ष म्हणून कार्य करीत आहेत.

डॉ. मंथा हे रोबोटिक्स या विषयातील विशेषज्ञ असून आपल्या पंचवीस वर्षांच्या अध्यापनाच्या कारकीर्दीपैकी पंधरा वर्षे त्यांनी हा विषय शिकविला. 'कंट्रोल थेरपी' व 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' या विषयांच्या अभ्यासक्रमनिर्मितीत त्यांचे महत्त्वाचे योगदान आहे. त्यांची संशोधनविषयक गुणवत्ता लक्षात घेऊन डीआरडीओ आणि बीएआरसी या संस्थांनी आपल्या प्रकल्पांसाठी त्यांचे वेळोवेळी साहाय्य घेतले आहे.

डॉ. मंथा यांनी 'कम्बशन मॉडेलिंग' या विषयावर मुंबई विद्यापीठातून आचार्य पदवी प्राप्त केली. विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील शोधपत्रिका तसेच परिषदा यांमधून त्यांचे जवळपास दोनशे शोधनिबंध प्रकाशित झालेले आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आतापर्यंत बारा विद्यार्थ्यांनी आचार्य पदवी (पीएच.डी.) प्राप्त केली आहे. 'ऑब्जेक्ट ओरियंटेड प्रोग्रामिंग इन सी ++', आणि 'एरोडायनॅमिक्स ऑफ कार्स' ही त्यांची दोन प्रकाशित पुस्तके आहेत. २००२ साली त्यांना शैक्षणिक कामगिरीबद्दल महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट शिक्षक राज्य पुरस्कार मिळालेला आहे.

डॉ. एस. एस. मंथा यांनी विविध संस्थांमधून महत्त्वाची पदे भूषविलेली आहेत. मुंबई विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विद्याशाखेचे ते अधिष्ठाता (Dean, Faculty of Technology) राहिलेले आहेत. 'मशिन्स ॲंड मेकॅनिझम असोसिएशन', 'कम्प्युटर सोसायटी ऑफ इंडिया' या संस्थांचे ते सदस्य असून महाराष्ट्र शासनाच्या माहिती-तंत्रज्ञान विभागावर विशेषज्ञ म्हणून नियुक्त आहेत. १९९५ साली महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागासाठी त्यांनी ई-गव्हर्नन्सचा पहिला प्रकल्प राबविला. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विविध कार्यालयांतून ई-गव्हर्नन्स अमलात आले. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेत अमलात आणलेल्या ई-गव्हर्नंस प्रकल्पासाठी त्यांना 'सिल्व्हर एज' पुरस्कार मिळालेला आहे.

२०१० साली त्यांना 'INFOCOM CMAI नॅशनल टेलेकॉम अवार्ड' मिळाला. याच वर्षी त्यांना 'HR-Nexus - the HR & Network, Leadership Award' मिळाला. मार्च २०१२ मध्ये कर्नाटकातील विश्वेश्वरय्या टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटीने (VTU) त्यांना डी.एस्सी. पदवीने सन्मानित केले. असे उच्चविद्याविभूषित आणि बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचे डॉ. एस. एस. मंथा आजच्या दीक्षांत समारंभाचे मान्यवर अतिथी म्हणून आपल्याला लाभले ही अतिशय आनंददायी बाब आहे. मी त्यांचे मनापासून स्वागत करतो.

तसेच आपणा सर्वांचेही मी स्वागत करतो आणि यानंतर संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या विविधांगी वाटचालीचा आढावा आपल्यापुढे सादर करतो, तसेच भविष्यातील संकल्पांविषयी आपणास माहिती देतो.

मित्रहो, शिक्षण, संशोधन, विकास आणि विस्तार हे कोणत्याही विद्यापीठाचे मूलाधार असतात. विद्यापीठाने या चतुःसूत्रीवर कायमच भर दिलेला आहे. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ गेली ३० वर्षे ज्ञानदानाचे पवित्र कार्य करीत आहे. विद्यार्थी हा या विद्यापीठाचा केंद्रवर्ती घटक आहे. त्याला ज्ञानसंपन्न करणे व त्यासाठी उत्तम शैक्षणिक सोयी-सुविधा पुरविणे हे

विद्यापीठाचे आद्य कर्तव्य आहे. या दृष्टीने विद्यापीठ आपली वाटचाल करीत आहे.

इंडिया टुडे या भारतातील विख्यात साप्ताहिकाने देशभरातील कला, वाणिज्य आणि विज्ञान विषयांचे शिक्षण देणाऱ्या विद्यापीठांची शैक्षणिक पाहणी केली (सर्व्हे) आणि मे २०१२ मध्ये देशभरातील उत्कृष्ट ठरलेल्या पन्नास विद्यापीठांची यादी घोषित केली. या यादीत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाला मानाचे सत्ताविसावे स्थान मिळाले ही आपल्या दृष्टीने गौरवाची बाब आहे. विशेष म्हणजे या पाहणीत महाराष्ट्रातील इतर विद्यापीठांच्या तुलनेत आपली कामगिरी सरस ठरली आहे. ही कामगिरी पुढील काळात आणखी उंचावण्याचा आपण प्रयत्न करणार आहोत.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने शैक्षणिक व प्रशासकीय प्रक्रियांमध्ये बदल घडवून आणत वेगाने प्रगती सुरू केलेली आहे. विद्यापीठाने प्रवेश अर्ज भरण्यापासून विविध कामे On-Line करण्याची प्रक्रिया सुरू केली असून त्यात दिवसेंदिवस भर पडत आहे. विद्यापीठाच्या प्रशासकीय कामकाजात ई-गव्हर्नंसला चालना देण्यात आली आहे. उच्च शिक्षणात कालानुरूप बदल घडत आहेत. याला अनुसरूनच विद्यापीठाचा अभ्यासक्रम अद्ययावत तसेच इंडस्ट्रीबेस्ड व रोजगाराभिमुख करण्यावर आमचा भर आहे. आवश्यकतेनुसार नवे अभ्यासक्रम विद्यापीठात सुरू करण्यात येत आहेत. यावर्षी विद्यापीठाच्या विभागातून एम. ई. (कम्प्युटर सायन्स ॲंड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी) हा अभ्यासक्रम सुरू झाला तर पुढील शैक्षणिक वर्षापासून एम.टेक.(सिग्नल प्रोसेसिंग) हा अभ्यासक्रम सुरू करण्यात येईल. याशिवाय विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अर्थसाहाय्यातून काही विभागात व महाविद्यालयांत इनोव्हेटिव्ह प्रोग्राम्स अंतर्गत अभ्यासक्रम उपलब्ध करून दिले जात आहेत.

१२ व्या पंचवार्षिक योजनेत शैक्षणिक विकासासाठी विद्यापीठाने १२६ कोटी १३ लक्ष रुपयांचा प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोगाकडे सादर केला असून विद्यापीठ अनुदान आयोगाकडून नियमित सोयीसुविधांसाठी (जनरल डेव्हलपमेंटसाठी) १ कोटी ९६ लक्ष रुपये, एससी/एसटी कोचिंग स्कीमसाठी दहा लक्ष रुपये आणि इक्वल अपॉर्च्युनिटी सेलसाठी पन्नास हजार रुपये इतके अनुदान प्राप्त झालेले आहे. स्पेशल असिस्टंस प्रोग्राम (SAP) अंतर्गत बायोटेक्नॉलॉजी विभागासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाकडून यावर्षी ३५ लक्ष ९७ हजार रुपयांचे अनुदान मंजूर झाले आहे. १२व्या योजनेअंतर्गत वुमन स्टडी सेंटरसाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने १९ लक्ष ३५ हजार रुपयांचे अनुदान मंजूर केले आहे. २०१३-२०१४ करिता आपत्ती व्यवस्थापनासाठी व्यवस्थापन परिषदेने विशेष बाब म्हणून आठ लाख रुपयांची तरतूद केलेली आहे. तसेच विद्यार्थिनींच्या

संरक्षणासाठीदेखील विद्यापीठाने योग्य पाऊले उचलली आहेत.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या 'स्कीम ऑफ कॉलेज विथ पोटेंशिअल फॉर एक्सलंस' (CPE) अंतर्गत विद्यापीठातील संलग्नित महाविद्यालयांपैकी अमरावती येथील शारीरिक शिक्षण महाविद्यालय (HVPM), अमरावती येथील श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, बुलडाणा येथील जिजामाता महाविद्यालय, अकोला येथील श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय या महाविद्यालयांना अनुदान प्राप्त झाले आहे.

विद्यापीठाच्या विविध विभागांमधील आणि संलग्नित महाविद्यालयांतील संशोधन प्रकल्पांना वेगवेगळ्या संस्थांकडून अनुदान प्राप्त झाले असून संबंधित संशोधनाचे कार्य सुरू आहे. सद्यःस्थितीत विद्यापीठामध्ये ३३ विद्यापीठ शिक्षकांचे संशोधन प्रकल्प सुरू असून ११ संशोधन प्रकल्प वेगवेगळ्या वित्तीय संस्थांकडे अर्थसाहाय्यासाठी पाठविण्यात आले आहेत.

विद्यापीठातील आणि संलग्नित महाविद्यालयांतील अनेक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व सहायक प्राध्यापक तसेच संशोधक विद्यार्थी यांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय तसेच राज्यस्तरावरील चर्चासत्र, परिसंवाद आणि कार्यशाळा यांमधून सहभाग नोंदविला तसेच आपले शोधनिबंध सादर केलेत. विद्यापीठातील विविध विभागांतून तसेच संलग्नित महाविद्यालयांतून अभ्यासक विद्यार्थ्यांनी तसेच अध्यापकांनी आचार्य पदवीसाठी संशोधन पूर्ण केले आहे.

संशोधनाला चालना देण्यासाठी विद्यापीठ तसेच संलग्नित महाविद्यालयांमार्फत पुढाकार घेण्यात येतो. यावर्षी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या वनस्पतिशास्त्र विभागाने दि. २८ ते ३० ऑक्टोबर २०१२ या कालावधीत 'इनोव्हेटीव्ह प्रॉस्पेक्ट्स इन अँन्जिओस्पर्म टॅक्सॉनॉमी' या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले. भौतिकशास्त्र विभाग, गृहविज्ञान विभाग, मराठी विभाग, हिंदी विभाग या विभागांनी राष्ट्रीय चर्चासत्र-परिषदांचे आयोजन केले. तर रसायनशास्त्र विभाग, गृहविज्ञान विभाग, शिक्षण विभाग, मराठी विभाग या विभागांनी कार्यशाळांचे आयोजन केले. संलग्नित महाविद्यालयांनीसुद्धा अशा तऱ्हेचे कार्यक्रम यशस्वीरित्या आयोजित केले.

विद्यापीठाने आपल्या सेवेचा दर्जा अधिक वाढविण्याच्या दृष्टीने देशान्तर्गत आठ नामांकित संस्थांसोबत सामंजस्य करार (M.o.U.) केलेले आहेत. तसेच संशोधनविषयक विचारांचे आदानप्रदान करण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर स्पेनमधील व्हॅलेंशिया विद्यापीठाशी सामंजस्य करार केला आहे. शिवाय विद्यापीठात स्वतंत्र अशा रिसर्च व पेटंट सेलची स्थापना केली आहे. संशोधनक्षेत्रातील शिक्षकांनी संशोधनाबरोबर Patents मिळविण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. विविध संशोधने

आणि Patents विद्यापीठास उच्चतम दर्जा प्राप्त करून देतील, अशी मला आशा आहे. यावर्षी विद्यापीठातील विविध विभागातील व संलग्नित महाविद्यालयातील अध्यापकांनी पेटंट्स मिळविण्यासाठी संबंधित संस्थांकडे प्रस्ताव सादर केले आहेत.

विद्यापीठाच्या विविध विभागांमधील तसेच संलग्नित महाविद्यालयातील काही शिक्षकांना राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावरचे पुरस्कार मिळाले; तसेच काही अध्यापकांची शासकीय आणि निमशासकीय पदांवर नियुक्ती झाली असून ही गोष्ट विद्यापीठाचा नावलौकिक वाढविणारी आहे. या शिक्षकांच्या ज्ञानाचा आणि अनुभवाचा फायदा त्या त्या संस्थांना निश्चितच होईल, याबद्दल मला खात्री आहे.

विद्यापीठाचे ग्रंथालय कालदृष्ट्या अद्ययावत करण्याचे काम वेगाने सुरू आहे. विद्यापीठातील संशोधने, तत्सम लेखन, विद्यापीठात येणाऱ्या मान्यवरांची, तज्ज्ञांची लिखित स्वरूपातील भाषणे, इतर प्रकाशने, असे साहित्य समाजापर्यंत पोचविण्यासाठी इंस्टिट्यूटल रिपोझिटरी विकसित करण्याचे काम ग्रंथालयामार्फत सुरू आहे. विद्यापीठाच्या आचार्य पदवीप्राप्त शोधप्रबंधांच्या डिजीटायझेशनची प्रक्रियादेखील सुरू आहे. भारतातील विविध विद्यापीठातील शोधप्रबंधांचा फुल टेक्स्ट डेटाबेस अहमदाबाद येथील INFLIBNET केंद्राद्वारे 'शोधगंगा' प्रकल्पाच्या माध्यमातून विकसित होत असून सामंजस्य कराराद्वारे आपले विद्यापीठ यात सहभागी झाले आहे.

विद्यार्थ्यांच्या सामाजिक बांधीलकीचे अंग विकसित होण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यापीठात व संलग्नित महाविद्यालयांत विविध कार्यक्रम, कार्यशाळा तसेच शिबिरांचे आयोजन करण्यात येते. या अंतर्गत विद्यार्थी व गावकरी यांच्या परस्पर सहकार्यातून समाजोपयोगी कार्यक्रम राबविले जातात. यावर्षी वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन, जलसंवर्धन, गाडगे बाबा ग्रामस्वच्छता अभियान, शेतकऱ्यांच्या आत्महत्यांसदर्भात मानसिक परिवर्तनाबाबत उपाययोजना, एड्स निर्मूलन, रक्तदान, साक्षरता, पल्स पोलिओ लसीकरण, महिला जनजागृती, आदिवासी जनजागृती, रक्तदान, व्यक्तिमत्त्व विकास, बेरोजगार युवक स्वयंरोजगार कार्यशाळा, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, आपत्ती व्यवस्थापनविषयक मार्गदर्शन इत्यादी कार्यक्रमांची यशस्वीरित्या अंमलबजावणी करण्यात आली. याशिवाय राष्ट्रीय सेवा योजना शिबीरांतून रस्ते-दुरुस्ती, रस्ते-बांधणी, शोषखड्ड्यांची निर्मिती, बंधाऱ्यांची निर्मिती, शेततळ्यांची उभारणी इत्यादी उपक्रम पार पाडण्यात आलेत.

विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय भावना वाढीस लागावी तसेच त्यांच्यातील कलागुणांना प्रोत्साहन मिळावे यासाठी दरवर्षी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील शारीरिक शिक्षण व रंजन

मंडळ प्रयत्नशील असून सातत्याने प्रगतीपथाकडे वाटचाल करीत आहे.

विविध कला व क्रीडा स्पर्धांमध्ये विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी उत्तम कामगिरी केली आहे. महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धा, आविष्कार, आव्हान, इंद्रधनुष्य, या स्पर्धांमध्ये तसेच पश्चिम विभागीय व अखिल भारतीय क्रीडा स्पर्धांमध्ये विद्यापीठाच्या खेळाडूंनी प्रावीण्य मिळविले आहे व विद्यापीठाचा नावलौकिक उंचावला आहे.

याचबरोबर विद्यापीठाच्या विविध पदव्युत्तर विभागांतून विद्यार्थी सेट-नेट, गेट, तसेच पॅट इत्यादी परीक्षांतून यश मिळवीत आहेत. काही विभागांतील विद्यार्थी गुणवत्ता यादीत स्थान पटकावीत आहेत. ही कौतुकास्पद बाब आहे.

विद्यापीठातील रोजगार व स्वयंरोजगार माहिती व मार्गदर्शन केंद्राद्वारे जास्तीतजास्त विद्यार्थ्यांना रोजगार मिळण्याच्यादृष्टीने आम्ही प्रयत्नशील आहोत.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील युजीसी-ॲकॅडेमिक स्टाफ कॉलेजमार्फत यावर्षी आतापर्यंत चार उद्‌बोधन वर्ग, दहा उजळणी वर्ग, तीन अल्पमुदतीचे वर्ग (शॉर्ट टर्म कोर्सेस), तसेच प्रशासकांसाठी एका इंटरॲक्टीव्ह मीटचे आयोजन करण्यात आले.

विद्यापीठातील शैक्षणिक प्रक्रियेत मानव संसाधन आणि विकास मंत्रालय पुरस्कृत A-VIEW (Amrita-Virtual Interactive e-Learning World) Software चे उपयोजन करण्यात येत असून त्याद्वारे विद्यार्थी तसेच विषयतज्ज्ञांमध्ये विचारांचे आदानप्रदान करण्यास प्रारंभ झालेला आहे. यावर्षी ए-व्हीव्हच्या साहाय्याने शैक्षणिक विषयावरील चर्चेत विद्यापीठातील तसेच इतर संस्थांमधील अभ्यासकांनी सहभाग घेतला. अशा नव्या पद्धतींचा शैक्षणिक क्षेत्रात उपयोग करून विचारांची देवाण-घेवाण करण्यावर आम्ही पुढे निश्चितच भर देऊ.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अंतर्गत २०१२-२०१३ या सत्रापर्यंत एकूण ४११ महाविद्यालये संलग्नित असून त्यात U.G.C. च्या 2 (F) 12 (B) सूचीमध्ये समाविष्ट महाविद्यालयांची संख्या ११८ इतकी आहे. विद्यापीठाच्या अंतर्गत नऊ विद्याशाखांच्या माध्यमातून पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण केले जातात. विद्यापीठाच्या २०१३ च्या उन्हाळी परीक्षेमध्ये विविध विद्याशाखांमधील एकूण सहाशे पंधरा परीक्षांना, अंदाजे दोन लाख पसतीस हजार परीक्षार्थी प्रवेशित आहेत. आजच्या दीक्षांत समारंभात विविध विद्याशाखांमधील १७८ संशोधकांना आचार्य पदवी प्रदान करण्यात आली आहे.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात आज संपन्न होत असलेल्या एकोणतिसाव्या दीक्षांत

समारंभात ८८ **सुवर्ण पदके, २१ रौप्य पदके व २३ रोख पारितोषिकांचे** वितरण करण्यात आले. यामध्ये एकोणतिसाव्या दीक्षांत समारंभापासून नव्याने सुरू होणाऱ्या एका सुवर्ण पदकाचा समावेश आहे.

विद्यापीठाच्या या महत्त्वपूर्ण उपलब्धींबरोबरच काही अडचणीही आमच्यासमोर आहेत. विद्यार्थ्यांची व संलग्नित महाविद्यालयांची संख्या लक्षात घेता विद्यापीठात आजरोजी उपलब्ध असलेले मनुष्यबळ अतिशय कमी आहे. निवृत्त झालेल्या व निकट भविष्यात निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या जास्त असल्यामुळे शिक्षक व शिक्षकेतर पदांची नितांत गरज आहे. शासनाकडून आवश्यक पदे मिळविण्याचा आमचा प्रयत्न सुरू आहे. तरीही शिक्षक, अधिकारी, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या अथक परिश्रमाने व सहकार्याने विद्यापीठ सातत्याने प्रगतीपथाकडे वाटचाल करीत आहे.

आपल्या सर्वांची इच्छाशक्ती आणि प्रामाणिक प्रयत्न यांच्या जोरावर विद्यापीठातील ज्ञान समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोचविण्याचा आपण प्रयत्न करू. तेव्हाच खऱ्या अर्थाने संत गाडगे बाबांच्या नावाने चालणारे हे विद्यापीठ डॉ. भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांच्या कल्पनेतील लोकविद्यापीठ ठरू शकेल.

विद्यार्थी मित्रांनो, आजच्या प्रसंगी मला तुम्हाला काही गोष्टी सांगायच्या आहेत :

१) आज उच्चशिक्षणात ग्रामीण भागातून आलेले तरुण मोठ्या संख्येने दिसतात. त्यांची बौद्धिक क्षमता कमी नसते. त्यांनी आपल्या डोळ्यापुढे डॉ. राधाकृष्णन, सर विश्वेश्वरैय्या, ए. पी. जे. अब्दुल कलाम इत्यादी थोर कर्तृत्ववान पुरुषांचे आदर्श ठेवले पाहिजेत. ही मंडळी ग्रामीण भागातूनच आलेली होती. यांनी पुढे भारताला त्या त्या क्षेत्रात दिशा दाखवली. तेव्हा ग्रामीण भारतातून पुढे येणाऱ्या तरुणांनी आत्मविश्वासाने पुढे आले पाहिजे.

२) आज असं दिसतं की, बहुतेक विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून कुठलातरी अधिकारीच बनायचे असते. स्पर्धा परीक्षा द्याव्यात. त्याद्वारा सरकारी अधिकारी बनावे- ही बाब चांगलीच आहे. त्याच्याविषयी दुमत असण्याचं कारण नाही. तथापि त्याबरोबर इतर पर्यायांचाही जरूर विचार करावा. अनेक क्षेत्रात आज नोकरीच्या संधी उपलब्ध आहेत, त्याचा विचार करता येतो. स्वयंरोजगाराच्यासुद्धा वाटा आहेत. किंबहुना ह्या दिशेनेही आपण विचार करणे अगत्याचे आहे.

३) आपला देश कृषिप्रधान देश आहे. कृषीशी निगडीत अनेक प्रक्रिया-उद्योग आज दिसतात. त्यातून मोठ्या प्रमाणावर तरुणांना रोजगार मिळू शकतो. त्याचाही तरुणांनी विचार करायला हवा.

४) सध्याचा काळ संशोधनवृत्ती जोपासण्यासाठी अनुकूल आहे. या काळात अधिकाधिक विद्यार्थ्यांनी संशोधनाकडे वळले पाहिजे. मुख्य म्हणजे संशोधन जसे नावीन्यपूर्ण (इनोव्हेटिव्ह) ठरले पाहिजे तसेच ते समाजोपयोगी असले पाहिजे. संशोधनक्षेत्रातील प्रगतीद्वारेच आपण महासत्ता होऊ शकतो. संशोधनक्षेत्राने आज समाजाच्या अडीअडचणींवर मार्ग दाखविला पाहिजे. आजच्या ग्रामीण भारताच्या समस्या जाणून घेऊन तरुणांनी त्यावर संशोधन केल्यास भारताला त्याचा मोठा लाभ होईल. तसेच आणखी एक बाब लक्षात घेणे आवश्यक आहे, विविध व्यवसायातील प्रक्रिया, त्याच्याशी संबंधित कौशल्ये-युक्त्या, रूढ प्रथा यात असणारे ज्ञान-विज्ञान शोधून ते प्रस्थापित करणे ही आज काळाची गरज आहे. जसे आजीबाईच्या बटव्यात साठलेले ज्ञान, विज्ञानाच्या पातळीवर तपासून शास्त्रसंमत करण्याची गरज आहे. विज्ञानाच्या विद्यार्थ्यांनी याकडे आवर्जून लक्ष द्यावयास हवे.

५) उच्चशिक्षण घेणाऱ्या तरुणांनी भाषा-कौशल्य आत्मसात करणे आवश्यक आहे.

६) संशोधनक्षेत्रातील विद्यार्थ्यांनी पेटंटप्रक्रियेबाबत जागरूकता दाखवून संशोधनातून पेटंट मिळविण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

७) आज भौतिक विकासामागे धावताना मूल्यसंस्कार बाजूला पडताहेत. अशा वेळी, पुन्हा एकदा संतांच्या विचारांची, सुधारक तसेच महापुरुषांच्या विचारांची गरज निर्माण झाली आहे. भारतीय विचार आणि संस्कृती यांनी जगाला मार्गदर्शन केले आहे. तेव्हा या देशाला आपल्या आजच्या समस्यांच्या निराकरणासाठी इतरांकडे पाहण्याची गरज नाही. भारताला महान राष्ट्र बनवायचे असेल तर आपल्या जीवनाला नैतिक मूल्यांची तसेच विज्ञान-तंत्रज्ञानाच्या विकासाला विवेकाची जोड द्यावी लागेल. यातूनच आम्हाला चांगल्या जीवनाची हमी मिळू शकेल.

मित्रहो, यावर्षी स्वामी विवेकानंदांची दिडशेवी जयंती सर्वत्र साजरी होत आहे. स्वामी विवेकानंदांनी शिक्षणविषयक मौलिक असे मार्गदर्शन केले आहे. ते म्हणतात,

> "साऱ्या शिक्षण-वळणाचे ध्येय 'माणूस' निर्माण करणे असले पाहिजे. शिक्षणाचा उद्देश आहे माणसाला विकसित होण्याला साहाय्य करणे."
>
> "आपल्याला आज अशा शिक्षणाची गरज आहे की ज्याने शील बनते, मानसिक शक्ती वाढतात, बुद्धी चौफेर, विशाल होते, आणि ज्यायोगे मनुष्य आपल्याच पायावर उभा राहू शकतो."

स्वामी विवेकानंदांचे हे विचार आजही महत्त्वाचे वाटतात. माणूस घडविण्यासाठी आपल्याला आपली सबंध शिक्षणव्यवस्था अधिक पणाला लावली पाहिजे. आज युवकांनी स्वामी विवेकानंदांच्या विचारांचे परिशीलन केल्यास आपल्या आधुनिक भारताचे भवितव्य निश्चितच उज्ज्वल राहील. उद्याचा भारत घडविण्यासाठी विद्यार्थी मित्रांनो स्वामी विवेकानंदांच्या म्हणण्यानुसार, उठा ! जागे व्हा ! आणि ध्येयसिद्धी होईपर्यंत थांबू नका !!!

मित्रहो, आता आपण अखिल विश्वासाठी प्रार्थना करू या :

**सर्वे भवन्तु सुखिनः । सर्वे सन्तु निरामयाः ।**

**सर्वे भद्राणि पश्यन्तु । मा कश्चित् दुःख भाग्भवेत् ।।**

पुन्हा एकदा सर्वांचे स्वागत करतो तसेच पदवी, पदके व पारितोषिके प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन करतो.

**धन्यवाद !**

**जय हिंद, जय महाराष्ट्र !**